Today गोंदिया
सकाळ
सोमवार २२ ऑक्टोबर २०१८ | ३

# शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे

## कीटकशास्त्रज्ञ चव्हाण यांचे आवाहन; आमगाव येथे शेतकरी, शेतमजुरांचा मेळावा

**आमगाव, ता. २१ :** शेतकऱ्यांनी अत्याधिक धानपिक उत्पादकता वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा अधिक वापर केला. त्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता कालांतराने कमी झाली. धानपिक उत्पादन खर्चाच्या मानाने उत्पन्न मात्र कमी झाले आहे. त्यामुळे रासायनिक खतांचा वापर टाळून शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे, असे आवाहन कीटकशास्त्रज्ञ आर. डी. चव्हाण यांनी केले.

### विशेष कार्याबद्दल शेतकऱ्यांचा सत्कार

**तालुक्यातील कृषी क्षेत्रात विशेष कार्य केल्याबद्दल लोककल्याण समूहातर्फे मान्यवरांच्या हस्ते काशीराम हेमने, वामन कटरे, किशोर रहांगडाले, नोहर चौधरी आदी शेतकऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.**




आमगाव : कार्यक्रमात बोलताना आर. डी. चव्हाण व उपस्थित मान्यवर.

लोककल्याण समूह शाखा आमगावच्या वतीने शेतकरी, शेतमजूर व इतर घटकातील कामगारांकरिताच्या शासनाच्या विविध लाभाच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन मेळावा येथील लक्ष्मणराव मानकर शैक्षणिक सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी अध्यक्षस्थानाहून ते बोलत होते.

मेळाव्याचे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी लखन बन्सोड यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून लोककल्याण समूहाचे प्रदेश अध्यक्ष प्रा. सुभाष आकरे, जिल्हा सरचिटणीस यशवंत मानकर, एम. व्ही. भोभाटे, अतुल येडे, राहुल डोंगरे, सुषमा शिवणकर, उमेश रहांगडाले उपस्थित होते.

लखन बन्सोड यांनी शासनाच्या शेतकरी हिताच्या विविध लाभाच्या योजना व पीक उत्पादन, रोग नियंत्रण व पीक व्यवसाय या विषयावर मार्गदर्शन केले. अतुल येडे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व लाभ, उत्पादन व समस्या त्यावरील उपाय याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित पाहुण्यांनी यथोचित मार्गदर्शन केले. प्रास्ताविक लोककल्याण समहाचे प्रदेश अध्यक्ष प्रा. सुभाष आकरे यांनी तर, संचालन यशवंत मानकर केले. आभार उमेश रहांगडाले यांनी मानले.